# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ / कार्तिक ५, १९४४ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

१३२. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ५७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ६ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण ५१ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी १५ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण प्रलंबित ३६ निवेदनांपैकी १३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री.रणधीर सावरकर, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"अकोला महानगरपालिका २० वर्षापेक्षा अधिक कालावधी पासून अस्तित्वात येणे, अकोला महानगरपालिकेच्या क्षेत्राची हद्दवाढ होऊन पालिकेचे क्षेत्र विस्तारीत होणे, अकोला महानरपालिकेकरिता अद्यावत आणि सुसज्य अशा इमारतीची गरज असणे, प्रशासकीय इमारतीसाठी महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूदी अंतर्गत २८ मार्च, २०१७ रोजी शासनाकडून १० कोटी रुपये विशेष तरतूद होणे. तथापी प्रशासकीय इमारतीच्या बांधकाम प्रस्तावास जागेअभावी तसेच तांत्रिक अडचणीमुळे अद्यापपर्यंत प्रशासकीय मान्यता नसणे, प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू करण्यासाठी झालेला विलंब दरम्यानच्या काळात बांधकामावरील बाबींच्या दरात झालेली प्रचंड वाढ लक्षात घेता वाढीव निधीची गरज निर्माण होणे, सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, आगामी पावसाळी अधिवेशनात पुरक मागण्यांमध्ये अकोला महानगरपालिकेच्या सुसज्य प्रशासकीय इमारत प्रस्तावास वाढीव निधीची तरतूद करणे, याबाबत शासनाची भुमिका व कार्यवाही."

---

मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

अकोला नगरपरिषदेचे दि.०१.१०.२००१ पासून महानगरपालिकेमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. सदर महानगरपालिकेमध्ये दि.३०.०८.२०१६ रोजी हद्दवाढ झाली असून यामध्ये २४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. या हद्दवाढीमुळे महानगरपालिकेचे क्षेत्र २८ चौ.कि.मी. वरुन १२४ चौ.कि.मी. इतके झाले आहे.

अकोला महानगरपालिकेची इमारत चार भागांमध्ये विभागली असून पूर्वेकडील १०५२ चौ.मीटर इमारत सन १९८३, पश्चिमेकडील ८३९ चौ.मीटर इमारत सन १९६५, उत्तरेकडील ६७० चौ.मीटर इमारत सन १९७७ व दक्षिणेकडील १२६४ चौ.मीटर इमारत सन २००० मध्ये बांधण्यात आली आहे. चारही इमारतींचे एकूण क्षेत्रफळ ४२०० चौ.मीटर इतके होते. यापैकी पश्चिमेकडील ८३९ चौ.मीटर इमारत मोडकळीस आल्यामुळे सन २००८ मध्ये पाडण्यात आलेली आहे. या जागी नवीन इमारत उभारण्यात आली नाही. सदर जागेचा वापर महानगरपालिकेद्वारे पार्किंगकरीता करण्यात येत आहे.

रेटा H/607 (730-10-22) — ८ ई.गा.प.

सद्यस्थितीमध्ये अकोला महानगरपालिकेकडे कार्यालयीन वापराकरिता वापरण्यायोग्य क्षेत्र ३३४१ चौ.मीटर इतके आहे. नगरसेवक व अधिकारी/ कर्मचारी वर्ग यांना सदर जागा वापरासाठी कमी पडत आहे. तसेच महानगरपालिकेच्या उपलब्ध तीन इमारती कालबाह्य झाल्या असून दूरावस्थेत आहेत.

अकोला नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाल्यानंतर प्रशासकीय इमारत अद्ययावत करण्यात आली नाही. प्रशासकीय कामकाजाकरिता अकोला महानगरपालिकेस अद्ययावत व सुसज्ज इमारत आवश्यक आहे. अकोला महानगरपालिकेमध्ये ३२ विविध विभाग कार्यरत असून या सर्व विभागाकरिता एकत्रित प्रशासकीय इमारतीची गरज लक्षात घेता शासनाने इमारतीच्या बांधकामाकरिता दि.२८.०३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रास मुलभूत सोईसुविधा विकासासाठी विशेष तरतूद या योजनेअंतर्गत रु.१०.०० कोटी इतका निधी महानगरपालिकेस मंजूर करण्यात आला आहे.

नवीन प्रशासकीय इमारतीकरिता अकोला शहरातील नझूल शिट क्र.५२ , नझूल भूखंड क्र.११/१ या शासकीय जागेची मागणी महानगरपालिकेने दि.२८.०८.२०१७ रोजी जिल्हाधिकारी अकोला यांना सादर केली. जिल्हाधिकारी, अकोला यांनी जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडे शैक्षणिक वापराकरिता ताब्यात असलेली जागा शासन जमा करण्याबाबत दि.२०.१२.२०१७ रोजी आदेश दिले. तसेच दि.१३.०६.२०१८ च्या आदेशान्वये कब्जेहक्काची रक्कम रु.५,८८,०४,१००/- इतका भरणा करण्याच्या अटीच्या अधीन राहून अगाऊ ताबा आदेश दिला होता. तथापि,अकोला महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सदर जमीन मोफत देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असतानाच जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदर शासकीय जागा निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध होत नसल्याने अगाऊ ताबा आदेश दि.२१.०९.२०२० च्या आदेशान्वये रद्द केले.

यामुळे दि.०५.०८.२०२२ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या इमारतीसाठी आवश्यक १४,७३२ चौ.मीटर जागा उपलब्ध होण्याकरिता नव्याने आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. सद्यस्थितीत अकोला महानगरपालिकेकडे इमारतीकरीता जमीन उपलब्ध नसल्याने इमारतीचे नियोजन झाले नाही.

परिणामी या इमारतीकरिता अतिरिक्त निधी संदर्भात कोणतीही मागणी आयुक्त, महानगरपालिका अकोला यांनी शासनास पाठविली नाही. जमीन उपलब्धतेकरिता जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

*********

## सन २०२२ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. चेतन तुपे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"शाळेची इमारत बांधण्याची परवानगी देताना पुणे महापालिकेकडून आवश्यक बाबींची पूर्तता करण्याकडे दुर्लक्ष झाल्याने चुकीच्या पध्दतीने झालेले शाळेचे बांधकाम, खाजगी जागामालक आणि महापालिका/संबधित शाळा यांच्या मधील वादावादीमुळे शाळेतील सुमारे अडीच हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पर्यायाने आयुष्यभराचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत तातडीने मार्ग निघून शाळा पूर्ववत सुरू होण्याची आवश्यकता, त्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कोंढवा बुद्रुक सर्वे क्र.५० मधील सिंहगड सिटीस्कूल संस्था यांचेतर्फे ला.आर्कि. श्री.पेठे यांचा मूळ लेआऊट नकाशा क्र.डीपीओ/७६५७/एफ/दि.१२.१२.२००६ व बांधकाम नकाशा दि.१५.०४.२००८ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे. मान्य विकास आराखड्याप्रमाणे सदर मिळकत अंशत: PSTN-३ आरक्षण (पोलीस स्टेशन आरक्षण), अंशत: C२-४ आरक्षण, २४ मी.डी.पी. रस्ता तसेच १८ मी.डी.पी. रस्त्याने बाधित होत आहे.

मान्य नकाशाप्रमाणे मिळकतीच्या उत्तरेकडे मान्य लेआऊट मधील बाधीत होणाऱ्या वरील नमूद आरक्षणाच्या पलीकडे निवासी भागावर शैक्षणिक इमारतीचे बांधकाम नकाशे मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर इमारतीस पोहोच रस्ता(येण्या-जाण्याकरीता) उपलब्ध नव्हता. सबब प्रस्तावधारक व ला.आर्की. यांनी तत्कालीन परिस्थितीनुसार सदर इमारतीच्या पूर्वेकडे दुसऱ्याच्या खाजगी मिळकतीमधून पोहोच रस्ता दर्शविलेला आहे. सदर बांधकाम मंजूरी वेळी प्रस्ताव धारक यांनी संमतीपत्रावरील अट क्र.४ नुसार "बांधकाम परवानगी मागण्यापूर्वी पोहोच रस्ता विकसित करणार" अशा अटीवर सिंहगड सिटीस्कूल संस्थेला परवानगी देण्यात आलेली आहे.

परंतु सदर पोहोच रस्ता अद्यापपर्यंत विकसित करण्यात अथवा उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये शाळेच्या इमारतीस कोणताही पोहच रस्ता उपलब्ध नाही. तसेच सदर शैक्षणिक इमारतीचे भोगवटापत्र घेण्यात आलेले नसून शाळेच्या इमारतीचा विनाभोगवटा वापर सुरु आहे ही वस्तुस्थिती आहे.

सिंहगड सिटीस्कूल प्रशासनाने भोगवटा पत्र न घेता इमारतीचा वापर सुरू आहे. विनाभोगवटा वापर सुरू असल्या कारणाने दंडास पात्र असल्याबाबत दि.१९.०३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सिंहगड सिटीस्कूल प्रशासनाला महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

मिळकत धारक यांनी प्रस्ताव मान्य करतेवेळी पोहच रस्त्याबाबत नकाशावर विपरस्त/चुकीची माहिती दर्शविल्यामुळे व मान्य नकाशावरील अटींची पूर्तता न करता बांधकाम केले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २५८ अन्वये बांधकाम नकाशे का रद्द करण्यात येवू नये याबाबत दि.२९.११.२०२१ अन्वये सिंहगड सिटीस्कूल संस्थेस महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आली आहे.

सदर मिळकतीमधील PSTN-३ आरक्षणाची जागा अथवा C२-४ आरक्षणाची जागा अथवा डी.पी. रस्त्याची जागा अद्याप पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेली नाही. तसेच सदर मिळकतीच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील इतर खाजगी जागा, संबंधीत जागा मालकांनी अद्याप पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेली नाही.

सदर डी.पी. रस्त्याची जागा एफ.एस.आय. किंवा टी.डी.आर. च्या बदल्यात ताब्यात देण्यासाठी वेळोवेळी जागा मालक यांच्याशी पत्र व्यवहार देखील करण्यात आला आहे. परंतु सिंहगड सिटीस्कूल तर्फे प्रस्तावधारक यांनी सदर जागेचा मोबदला रोख रक्कमेच्या स्वरुपात मिळणेची मागणी महानगरपालिकेकडे केली आहे. परंतु पुणे महानगरपालिकेचे आर्थिक धोरण विचारात घेता रोख रक्कमेच्या स्वरुपात मोबदला देणे अडचणीचे आहे. त्यामुळे अद्याप कोणतेही जागा मालक सदर डी.पी. रस्त्याने बाधित जागा ताब्यात देण्यास तयार नाहीत. त्यामुळे खाजगी जागा मालकांनी सिंहगड सिटीस्कूलकडे खाजगी जागेतून जाणारा रस्ता दोन्ही बाजूने पत्रे लावून बंद केला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

प्रस्तावीत २४.०० मी. डी.पी. रस्त्याने बाधीत होणाऱ्या मिळकतीचे सिंहगड सिटीस्कुल जागामालक आणि इतर खाजगी जागा मालक यांनी सदर डी.पी. रस्त्याने बाधीत होणारी जागा एफ.एस.आय. अथवा टी.डी.आर. च्या मोबदल्यात पुणे महानगरपालिकेस ताब्यात दिल्यास सदर समस्येचे निराकरण होणे शक्य होईल.

*****

# महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग | लक्षवेधी सूचना क्र.३०१

सन २०२२ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**सर्वश्री.छगन भुजबळ, श्री.अजित पवार, श्री.जयंत पाटील, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, डॉ.जितेंद्र आव्हाड, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक महानगरपालिका मलनिस्सारण केंद्रांच्या आधुनिकीकरण व क्षमतावाढीबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविणेबाबत लोकप्रतिनिधींनी दि. ९ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे निवेदनाव्दारे मागणी केलेली असणे, नाशिक शहरातून गटारीच्या माध्यमातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते नदीपात्रात सोडण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने तपोवन येथे १३०, आगरटाकळी येथे ११०, चेहेडी येथे ४२ तसेच पंचक येथे ६०.५ एमएलडी असे एकूण ३४२.५० एमएलडी क्षमतेची मलनिस्सारण केंद्रे उभारली असणे, ही केंद्रे सन २०१५ पूर्वी वेळोवेळी कार्यान्वित झालेली असणे, सदर केंद्रे बांधकाम व कार्यान्वित करतेवेळी त्या त्या वेळी लागू असलेल्या निकषानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची संमती घेण्यात आली असणे, तथापि दरम्यानच्या काळात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी निकष अधिक कडक केल्याने नवीन निकषानुसार मलनिस्सारण केंद्राचा सुधारित डी.पी.आर. करणे आवश्यक झाले असणे, त्या अनुषंगाने नाशिक मनपाने अस्तित्वात असलेल्या चारही मलनिस्सारण केंद्रांचे सुधारित डी.पी.आर. केलेले असून महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण विभागाला ऑक्टोबर २०२१ मध्ये सादर केलेले असणे, मात्र राज्य सरकारकडून अद्यापही हा प्रस्ताव केंद्राच्या जलशक्ती मंत्रालयाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला नसणे, नाशिक शहराचा वाढता विस्तार व वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नाशिक शहरातून वाहणाऱ्या गोदावरी व तिच्या उपनद्या यांचे स्वच्छतेच्या दृष्टीने सदर मलनिस्सारण केंद्राची अत्यंत आवश्यकता असणे, महाराष्ट्र शासनाच्या वतीने सदर प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविणेची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सद्यास्थितीत तपोवन (१३० द.ल.लि. प्रतीदिन), आगरटाकळी (११० द.ल.लि. प्रतीदिन), चेहेडी (४२ द.ल.लि. प्रतीदिन), पंचक (६०.५० द.ल.लि. प्रतीदिन), गंगापुर (१८ द.ल.लि. प्रतीदिन) व पिंपळगाव खांब (३२ द.ल.लि. प्रतीदिन) हे सहा मलनि:सारण केंद्र बांधून कार्यान्वित करण्यात आले असून, त्यांची एकूण स्थापित क्षमता ३९२.५० द.ल.लि. प्रतीदिन आहे. तसेच सद्यास्थितीत सुमारे १९१९ कि.मी. मलवाहिकेचे जाळे टाकण्यात आले असुन नव्याने विकसीत परीसरात मलवाहीका टाकण्याचे काम नाशिक महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

रोटा H1542 (700-9-22)

नाशिक महानगरपालिकेच्या वरील सर्व मलनि:सारण केंद्रांवर येणाऱ्या सांडपाण्यावर सदर मलनि:सारण केंद्र बांधतांना त्यावेळच्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मापदंडानुसार मलनि:सारण प्रक्रिया करण्यात येत आहे. सद्या सर्व मलनि:सारण केंद्र मिळुन सुमारे ३५० ते ३६० द.ल.लि. प्रतीदिन इतके सांडपाणी आणले जात आहे व त्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.

केंद्रीय तसेच राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत मलनि:सारण केंद्रात मलनि:सारण प्रक्रिया केल्यानंतर सोडण्यात येणाऱ्या प्रक्रियायुक्त पाण्याच्या निकषांमध्ये बदल करण्यात आले असून सदर निकष अधिक कठिण करण्यात आले आहेत. त्यानुसार अमृत योजनेअंतर्गत बांधण्यात आलेले गंगापुर (१८ द.ल.लि. प्रतीदिन) व पिंपळगाव खांब (३२ द.ल.लि. प्रतीदिन) या एकूण ५० द.ल.लि. प्रतीदिन क्षमतेच्या मलनि:सारण केंद्रांमध्ये सद्यस्थितीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी निश्चित केलेल्या नविन निकषानुसार प्रक्रिया केली जाते व प्रक्रियायुक्त पाणी नदीत सोडण्यात येते.

परंतु यापुर्वीचे तपोवन, पंचक, आगरटाकळी व चेहडी या ठिकाणी बांधलेले ३४२.५० द.ल.लि. क्षमतेचे मलनि:सारण केंद्र हे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या तत्कालिन निकषानुसार सन २००३ ते सन २०१५ दरम्यान बांधण्यात आलेले असल्याने त्यातुन मलनि:सारण प्रक्रियेनंतर सोडण्यात येणारे प्रक्रियायुक्त पाणी सद्यस्थितीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी निश्चित केलेल्या नविन निकषानुसार नाही. यासाठी नाशिक महानगरपालिकेने उपरोक्त चारही ठिकाणी अस्तित्वातील मलनि:सारण केंद्रांमध्ये सुधारणा प्रस्तावित केली असुन त्यासाठी सल्लागार नेमुन रु.४००.१४ कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. त्याचा तपशिल पुढिल प्रमाणे आहे.

| अ. क्र. | एसटीपीचे झोन | एसटीपी क्षमता (एम.एल.डी.) | डीपीआर किंमत (रक्कम रु. कोटीमध्ये) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कॅपिटल कॉस्ट | ५ वर्ष देखभाल दुरुस्ती | एकूण |
| ०१ | तपोवन | १३०.०० | ११७.७९ | २३.६५ | १४१.४४ |
| ०२ | आगरटाकळी | ११०.०० | ९६.९६ | १८.९४ | ११५.९० |
| ०३ | चेहेडी | ४२.०० | ५२.३५ | १३.७९ | ६६.१४ |
| ०४ | पंचक | ६०.५० | ६०.०७ | १६.५६ | ७६.६३ |
| | एकूण | ३४२.५० | ३२७.१७ | ७२.९४ | ४००.११ |

नाशिक महानगरपालिकेने ऑक्टोंबर २०२१ मध्ये सदर प्रकल्प अहवाल राज्य शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत मंजुर करुन, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत (NRCP) निधी मिळणेसाठी केंद्र शासनास पाठविण्याकरिता पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे सादर केला होता. तसेच, सदर प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.०९.०६.२०२२ च्या पत्रान्वये विनंती केली होती. त्याअनुषंगाने, नाशिक महानगरपालिकेने सादर केलेला वरीलप्रमाणे प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी शिफारशींसह पाठविण्याची पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास विनंती करण्यात आली होती.

राज्य नदी संवर्धन प्रस्तावांवर निर्णय घेण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत दि.०१.०३.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सचिव स्तरावरील प्रदत्त समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या दि.१३ जुन, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत सदर प्रकल्प अहवालास खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन मान्यता देण्यात आली आहे.

१) सदर प्रंकल्पास मंजुरी प्राप्त झाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेचा जो काही हिस्सा केंद्र शासन ठरवुन देईल तो हिस्सा स्थानिक संस्था भरण्यास तयार असल्याबाबतचा ठराव / हमीपत्र सादर करावे.

२) महानगरपालिकेने सादर केलेल्या अस्तिवातील एस.टी.पी.च्या सुधारणेसाठी प्रस्तावित केलेल्या तंत्रज्ञानाच्या प्रस्तावास निरी/आय.आय.टी., मुंबई अथवा तत्सम त्रयस्त नामांकित संस्थेमार्फत प्रमाणित करुन घ्यावे.

प्रदत्त समितीने सूचविलेल्या वरील दोन्ही मुद्द्यांबाबतची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने, राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत नाशिक शहराची मलनिस्सारण व्यवस्थापन सुधारणा करण्याबाबत रु.४००.१४ कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडून मान्य झाल्यास नाशिक महानगरपालिकेचा जो काही हिस्सा केंद्र शासन ठरवुन देईल तो हिस्सा भरण्यास, तसेच प्रस्तावातील तंत्रज्ञानाच्या प्रस्तावास आय.आय.टी., मुंबई, आय.आय.टी., रुरकी अथवा तत्सम त्रयस्थ नामांकित संस्थेमार्फत प्रमाणित करुन घेण्याकामी जी काही तपासणी फी द्यावी लागेल ती अदा करण्यास नाशिक महानगरपालिका महासभा ठराव क्र.२२, दि.२०.०८.२०२२ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार, याबाबतचा प्रस्ताव नाशिक महानगरपालिकेने दि.२३.०८.२०२२ रोजी केंद्र शासनाच्या जल शक्ती मंत्रालयाकडे पाठविला आहे. सदर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर जुन्या अस्तित्वातील मलनि:सारण केंद्रांमध्ये सुधारणा करण्याची कामे हाती घेण्यात येऊन प्रकल्प विहित कालावधीत पुर्ण करण्यात येतील, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.

******************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३२५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मातंग समाजाची वर्गवारी करुन अ, ब, क, ड नुसार स्वतंत्र आरक्षण देण्यासह समाजातील विविध मागण्यांसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने शासनास निवेदन देण्यात येणे मातंग समाज हा महाराष्ट्रासह संपुर्ण देशात वास्तव्यास आहे. या समाजातील बहुतांशी नागरिक भूमीहीन असून, मोलमजुरी करुन आपले जीवन जगत असणे. उच्च शिक्षणापासून हा समाज वंचित असणे. तसेच शासकीय सेवेत देखील या समाजातील युवकांची संख्या अत्यंत अल्प असणे. शासनाने त्यांच्या मागण्या व प्रश्न सोडवून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता. मातंग समाजास अ,ब,क,ड अनुसार वर्गवारी करून स्वतंत्र आरक्षण त्वरित लागू करण्याची आवश्यकता, साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची आवश्यकता. आद्य क्रांतिगुरू लहूजी वस्ताद साळवे यांचे संगमवाडी (जि.पुणे) येथे भव्य स्मारक करण्यासाठी शासकीय पातळीवर लवकरात लवकर प्रयत्न करण्याची आवश्यकता, मुंबई विद्यापि ठास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी शासनाच्या मंजुरी ची आवश्यकता, गंजपेठ पुणे येथील देशातील पहिली व्यायाम शाळा सुरू करून तेथे अनेक क्रांतिकारक घडविणाऱ्या लहुजी वस्ताद यांच्या क्रांती शाळेस लहुजी वस्ताद साळवे यांचे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोग त्वरित कार्यान्वित करून, त्यांचे नाव राष्ट्रपुरूषांच्या यादीत समाविष्ट करण्याची आवश्यकता, साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे थेट कर्ज प्रकरण त्वरित सुरू करणे आणिअण्णाभाऊ साठे महामंडळाचे थकीत कर्ज माफ करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने करण्यात आली असणे. मातंग समाजाच्या या सर्व मागण्यांवर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

अनुसूचित जातींच्या यादीत बदल करण्याचे अधिकार राज्य शासनास नसून केंद्र शासनास आहेत. भारतीय घटनेच्या कलम ३४१ अंतर्गत मा.राष्ट्रपतींच्या आदेशान्वये दि.११ ऑगस्ट, १९५० रोजी अनुसूचित जाती प्रवर्गात सामाविष्ट असलेल्या जातींची यादी निश्चित केली आहे. शासन निर्णय दि.२६.९.२००८ अन्वये महाराष्ट्र राज्यातील विविध प्रवर्गात सामाविष्ट असलेल्या जातींची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार अनुसूचित जाती प्रवर्गात ५९ जातींची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता १३ टक्के आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत अनुसूचित जाती प्रवर्गात सामाविष्ट असलेल्या काही जातींच्या संघटनांकडून अनुसूचित जाती प्रवर्गात अ, ब, क, ड असे वर्गीकरण करून त्यांना वेगवेगळे आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत आहे. मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी सिव्हील अपील क्र.६७५८/२००० ई. व्ही. चिन्नैया विरुध्द मध्य प्रदेश राज्य प्रकरणी पाच सदस्यीय खंडपीठाने दि.५.११.२००४ रोजी राष्ट्रपतींच्या आदेशान्वये तयार करण्यात आलेल्या एकसंघ यादीमध्ये पुन्हा विभाजन करता येणार नसल्याचा निर्णय दिलेला आहे. जर अनुसूचित जातीच्या सदस्यांच्या वर्गातील एक वर्ग तयार केला गेला तर तो माननीय महामहिम राष्ट्रपतीद्वारे घोषित अनुसूचित जातीच्या यादीशी छेडछाड करण्यासारखे होईल व असे उप-वर्गीकरण

भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ चे उल्लंघन करेल व ही बाब घटनाबाह्य ठरेल, असेही मा.सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त आदेशात नमूद केले आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान देवून गौरविण्याची विनंती तत्कालीन मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचेकडून तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय यांना दि.१३.८.२०२० रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे. तथापि, या विषयाच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने भारतरत्न पुरस्कारासंदर्भात दि.३०.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये भारतरत्न पुरस्कारासाठी मान्यवरांची शिफारस महामहिम मा.राष्ट्रपती यांचेकडे पंतप्रधान स्वत: करतात. त्यासाठी इतर कोणत्याही औपचारिक शिफारशीची आवश्यकता नाही, अशा सुचना दिलेल्या आहेत.

या विभागाचा शासन निर्णय, दिनांक २४ मार्च, २०१७ नुसार शासनाने एकूण २८ ऐतिहासिक स्थळांना मान्यता दिलेली यादी मध्ये अनुक्रमांक २० मध्ये क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक, संगमवाडी, जि.पुणे या स्थळाचे नाव समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच, शासन ज्ञापन, दि.३.०२.२०२२ अन्वये स्मारकाच्या भूसंपादनासाठी रु.८७,११,००,०००/- (अक्षरी रुपये सत्याऐंशी कोटी अकरा लाख फक्त) इतक्या निधीची पुरक मागणी विधीमंडळात मंजूर करण्यात आलेली असून सदरील निधी खर्च करण्याबाबत मान्यता प्रदान केलेली आहे. समाजकल्याण आयुक्तालय यांचे आदेश, दि.७.३.२०२२ अन्वये सदरील रक्कम सहायक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना वितरीत करण्यात येवून सदर रक्कम दि.३१.३.२०२२ अन्वये पुणे महानगरपालिका, पुणे यांना वर्ग करण्यात आलेली आहे. याबाबत, महानगरपालिका, पुणे यांचे स्तरावरुन कार्यवाही चालू आहे.

मुंबई विद्यापिठास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासंदर्भात मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचेकडून कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

अनुसूचित जातीविषयक कल्याणकारी धोरणाचा मातंग समाजाच्या व्यक्तींना योग्य प्रमाणात लाभ व्हावा व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २००३ रोजी क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग गठीत केला होता. सदर आयोगाने दिनांक ३१.०८.२००८ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. आयोगाने शासनास शिफारशी केलेल्या ८२ शिफारशींपैकी ६८ शिफारशी शासनाने शासन निर्णय दि.३१.१२.२०११ अन्वये तत्वत: मान्य केल्या आहेत. सदर शासन निर्णयातील शिफारशींबाबत विविध विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

या विभागाचा शासन निर्णय, दि.८.०६.२०२२ अन्वये साहित्यरत्न लोकशाहिर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ स्थापनेच्या वेळी मंजूर करण्यात आलेल्या अधिकृत भागभांडवलामध्ये रू.३००.०० कोटीवरून रू.१,००० कोटीपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महामंडळास विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य अंतर्गत एकूण प्राप्त निधीअंतर्गत विविध योजना राबविण्यात येतात. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.३ लाख पर्यंत आहे अशा कुटुंबातील अर्जदारांना रु.५०,०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायासाठी बँकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते.

विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या एकूण निधीच्या १०% रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येते. मातंग समाजातील इयत्ता ४ थी पासून पुढे शिक्षण घेतलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवक/युवतींना स्वयंरोजगाराकरिता विविध व्यवसायिक प्रशिक्षण शासन मान्य संस्थांमार्फत दिले जाते.

तसेच, राज्य शासनाअंतर्गत महामंडळास भागभांडवली अंशदानातून प्राप्त निधीतून वार्षिक उत्पन्न मर्यादा रक्कम रू.३,००,०००/- असणाऱ्या कुटूंबांना रु.५०,००१/-ते रु.७,००,०००/- पर्यंतच्या गुंतवणूक असलेल्या मंजूर कर्ज प्रकरणांत महामंडळाकडून २०% सहभाग (रु.१०,०००/- अनुदानासह)

गुंतवणूकीच्या प्रमाणात बीजभांडवल कर्जरुपात ४% व्याजदराने मंजूर करण्यात येते. शासन निर्णय, दि.३०.११.२००४ अन्वये रू.२५,०००/- पर्यंतच्या प्रकल्प मर्यादा असलेल्या कर्ज प्रकरणांना बीजभांडवल योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय थेट कर्ज योजनेमध्ये २% व्याज दराने लाभार्थींना कर्ज निधी वितरीत केला जातो. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना अंतर्गत मातंग समाजातील इयत्ता १० वी ,१२ वी, पदवी व पदविका व पदव्युत्तर परीक्षेत ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती दिली जाते. ही योजना मा.मुख्यमंत्री निधीतून महामंडळास मिळालेल्या रू.२०.०० लाख निधीच्या मिळणाऱ्या व्याजातून प्रतिवर्षी राबविण्यात येते.

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (NSFDC) च्या निधीतून रू.५.०० लाखापर्यंत असलेल्या व्यवसायांकरिता ५ वर्षांकरिता मुदत कर्ज दिले जाते. सदर कर्ज रक्कमेपैकी २०% रक्कम (रू.१०,०००/- अनुदानासह) द.सा.द.शे. ४% व्याज दराने महामंडळामार्फत देण्यात येते. सन २०००-०१ पासून प्रती लाभार्थी रू.५०,०००/- च्या मर्यादेत लघुऋण वित्त योजना राबविण्यात येते. तसेच मातंग समाजातील युवक-युवतींना देशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रू.१० लाख व परदेशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रू.२० लाख इतके शैक्षणिक कर्ज मंजूर केले जाते.

**************

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना

१२.

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे तिसरे (पावसाळी)अधिवेशन**

**सर्वश्री. अजित पवार,जयंत पाटील,छगन भुजबळ,दिलीप वळसे-पाटील,हसन मुश्रीफ,बाळासाहेब पाटील,धनंजय मुंडे,कुमारी आदीती तटकरे, सर्वश्री. दत्तात्रय भरणे,प्राजक्त तनपुरे,राजेश टोपे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-**

"राज्यात नव्याने सरकार स्थापन होणे, नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर विकासात्मक दृष्टीकोन ठेवणे अपेक्षित असणे, त्यादृष्टीने राज्यकारभार करण्याची अपेक्षा असणे, नव्या सरकारने मात्र तत्कालीन सरकारने मंजुर केलेली विकास कामे रद्द करणे, रद्द कामाचे शासन निर्णय त्वरीत निर्गमित करणे, वास्तविक संबंधित लोकप्रतिनिधीच्या मागणीस्तव त्या- त्या जिल्हयात विकास कामांना मंजुरी दिलेली असणे, त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करून निधी वितरीत करण्यासाठी मा. सभागृहाची सुध्दा मान्यता घेतलेली असणे, त्यानुसार निधी वितरीत केलेला असणे, नवीन सरकारने मात्र या सभागृहाचा अवमान करून सरसकट सर्व विकास कामे रद्द करुन त्याचा निधी थांबविलेला असणे, काही कामांचे कार्यारंभ आदेश व काही कामांची निविदा प्रक्रिया झालेली असतांना सुध्दा निधी रोखून धरलेला असणे, निधी रद्द केलेल्या विकास कामांमध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील विकास कामासाठी आवश्यक असणाऱ्या २५१५-३०५४ अंतर्गत मंजुर असणाऱ्या कामांचा समावेश असणे, अल्पसंख्यांक, आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या त्या त्या घटकांसाठीच्या योजना यांचाही निधी रोखलेला असणे, विकसनशील व नव्याने निर्मिती झालेल्या नगरपंचायती तसेच नगरपरिषदा व नगरपालिका यांचाही विकास कामाचा निधी मोठ्या प्रमाणात रद्द केल्याने त्याचा विपरीत परिणाम या शहरांच्या विकास कामावर झालेला असणे, तत्कालीन सरकारने मंजुर केलेल्या वरील विकास कामांचा निधी रद्द करून नव्या सरकारने राजकीय दृष्टीकोन समोर ठेवून काही विशिष्ट लोकप्रतिनिधींना सदरचा निधी मोठ्या प्रमाणात पुनर्वाटप करणे, यामुळे इतर लोकप्रतिनीधींमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, नवीन सरकारच्या कार्यपध्दतीविषयी सभागृहातील लोकप्रतिनिधींच्या मनात निर्माण झालेले संशयाचे वातावरण, लोकप्रतिनीधींच्या विधीमंडळातील सदस्य म्हणून हक्काची होत असलेली पायमल्ली, याविषयी सभागृहातील लोकप्रतीनिधींच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका".

---

शेरा H/530 (710-8-22)

(अ.मा.प्र.

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नगर विकास विभागाअंतर्गत राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगपंचायतींना विविध योजनेंतर्गत विविध विकास कामांसाठी निधी मंजुर करण्यात येतो. सन २०२१-२२ या वर्षात विविध महानगरपालिका/नगरपरिषदा/नगपंचायतींना विविध योजनेंतर्गत विविध कामांना पुढील आदेशापर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत अनुसूचित जातीच्या १३ औद्योगिक सहकारी संस्थांना दिलेल्या मंजूरीस तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत दि. १ एप्रिल २०२२ पासून दि.२९.६.२०२२ पर्यंत मंजूरी दिलेल्या कामांना व पुस्तक खरेदीस स्थगिती देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पाच दिव्यांग शाळांना अनुदान तत्वावर दिलेल्या मान्यतेस व १ दिव्यांग शाळेतील ५ पदांना मंजूरी दिलेल्या आदेशांना स्थगिती देण्यात आली आहे. जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२२-२३ मध्ये मंजुर केलेल्या विविध योजनांतर्गत कामांना स्थगिती देण्यात आली आहे. तसेच नवीन पालकमंत्री महोदयांच्या नियुक्त्या झाल्यानंतर सदर प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांची यादी पालकमंत्री महोदयांच्या पुनर्विलोकनार्थ सादर करुन ती कामे पुढे चालू ठेवावीत किंवा कसे याबाबत नवनियुक्त पालकमंत्री महोदयांच्या सहमतीने निर्णय घेण्यात यावा, असे कळविण्यात आले आहे.

ग्राम विकास विभागाअंतर्गत ज्या प्रकरणी निविदा काढण्यात आलेल्या नाहीत तसेच ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कायादेश देऊनही कामे सुरु झालेले नाहीत अशा कामांना देखील स्थगिती देण्याचे प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करण्याचे निर्देश दिले .याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून स्थगिती कामांचा अहवाल विभागाकडे प्राप्त झाला नाही.

अल्पसंख्यांक विकास विभागाअंतर्गत अद्याप कोणत्याही कामांना स्थगिती देण्यात आलेली नाही. आदिवासी विकास विभागाअंतर्गत कामाबाबत पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत कोणत्याही प्रकारची पुढील कार्यवाही न करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

एकंदरीत विविध विभागाच्या मंजुर काही कामांना पुढील आदेशापर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.तथापी सदर कामे रद्द करण्यात आलेली नसुन सदर कामांचा आढावा घेऊन स्थगिती उठविण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

**********

लक्षवेधी सूचना

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**

**डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अनिल पाटील, यशवंत माने, शेखर निकम, दिपक चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या अनागोंदी गैरकारभारामुळे सर्वसामान्य गोरगरिब रुग्णांना आरोग्य सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याची गंभीर बाब ऑगस्ट, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे, या रुग्णालयात २१ पध्दतीच्या आजारांवर उपचार होणे अपेक्षित असतांना केवळ १० ते १२ रुग्णांवरच उपचार केले जात असल्याने रुग्णांना नाईलाजाने खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत असणे, या रुग्णालयात दैनदिन १५०० ते २००० बाहयरुग्ण उपचाराकरिता येत असून ३५० जनरल बेडवर उपचार सुरु असतांना आयसीयूमध्ये जागाच मिळत नसणे, रुग्ण उपचारांसाठी दाखल झाल्यानंतर उपचार घेणाऱ्या रुग्णांना औषधी बाहेरुन विकतच आणावी लागत असणे, सुमारे ८८० कर्मचारी/डॉक्टरांचा आकृतिबंध मंजूर असतांना सुमारे ८० टक्के जागा रिक्त असल्याने कार्यरत यंत्रणेवर अधिकचा ताण पडत असणे, डॉक्टर, नर्सेस व कर्मचाऱ्यांना विविध त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, पर्यायाने या रुग्णालयामध्ये गोरगरिब रुग्णांना योग्य पध्दतीची वागणूक मिळत नसून उपचारांपासून वंचित रहावे लागत असणे, ठाणे महापालिकेची लोकसंख्या सुमारे २५ लाखांवर गेलेली असतांना शहरात महापालिकेचे एकमेव रुग्णालय असणे, त्यामुळे सदरची आरोग्ययंत्रणा चालवितांना महापालिका प्रशासनाची दमछाक होत असणे, सदर रुग्णालयावर कोटयावधी रुपये खर्च करावे लागत असणे, आर्थिक टंचाईमुळे रुग्णालयामध्ये अत्याधुनिक सोयीसुविधा नसणे, रुग्णालयामध्ये ठाणे जिल्ह्यासह पालघर व रायगड जिल्ह्यातुनही रुग्ण उपचारांकरिता येत असणे, या सर्व बाबींचा विचार करता सदरचे रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय राज्य शासनाने ताब्यात घेऊन सुपर स्पेशालिटीच्या धर्तीवर अत्याधुनिक सोयी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधी, समाजिक संघटना, नागरीकांनी दि. १२ ऑगष्ट, २०२२ रोजी तसेच अलिकडील काळात मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे वारंवार मागणी करुनही कडक कार्यवाही केली जात नसल्याने, परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सदरबाबत आवश्यक उपाययोजना करण्यास प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>**

ठाणे महानगरपालिका या "ब" वर्ग महानगरपालिकेचे क्षेत्रफळ १२८ चौ.कि.मी असून शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार १८.४१ लक्ष आहे. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय सन १९९१ मध्ये सुरु करण्यात आले असून सन १९९२ मध्ये राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय हे संलग्नित करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी रुग्णालय ५०० खाटांचे आहे. सदरहू रुग्णालयात ठाणे जिल्हा व आसपासच्या पालघर, रायगड इ. जिल्ह्यातील विविध रुग्ण

दि. २. / मु. ५५८ C ७५०-e-2022J-9

औषधोपचारासाठी येतात. सन २०२२ ची आकडेवारी विचारात घेता रुग्णालयाच्या सोयी-सुविधांचा लाभ मोठ्या प्रमाणात रुग्ण घेत असल्याचे स्पष्ट होते. सन २०२२ मध्ये रुग्णालयात अंदाजित १६९९६ हजार रुग्ण दाखल झाले असून जवळजवळ ७११७ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ३२४५ महिलांच्या प्रसूतींचा समावेश आहे. मागील संपुर्ण वर्षात सुमारे १८१६३६ लक्ष बाह्य रुग्णांनी रुग्णालयाच्या सेवेचा लाभ घेतला आहे. तसेच ५६७२५ इतके रुग्ण अपघात विभागात होते. तसेच ६८१०२ क्ष-किरण तपासणी, २१३१० सोनोग्राफी व ४९०७८३ रक्त तपासण्या झाल्या आहेत.

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयात प्रतिवर्षी १०० पदवीपुर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. तसेच तेथे पदवी व पदवीका हे शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात सद्यस्थितीत २१ विभाग पुर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. तसेच सदर रुग्णालयात २० खाटांचे अद्ययावत अतिदक्षता विभाग, ४ शस्त्रक्रिया गृह, अद्ययावत शवागृह उपलब्ध आहेत. सदर रुग्णालयाच्या विस्तार केंद्र धर्मवीर आनंद दिघे हार्ट केअर व युरोलॉजी सेंटर येथे अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रिया गृह व कॅथलॅब कार्यरत आहेत. तसेच या व्यतीरिक्त श्रीमती गंगुबाई शिंदे रुग्णालय या विस्तार केंद्रात देखील शस्त्रक्रिया गृह व कॅथलॅब उपलब्ध करण्यात आले आहे. उपरोक्त दोन्ही ठिकाणी सुमारे ५०० बायपास शस्त्रक्रिया, १५०० अ‍ॅन्जीयोप्लॅस्टी शस्त्रक्रिया व इतर २०० शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केलेल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये रुग्णांना बहुतांश औषध पुरवठा करण्यात येतो. काही औषधे जी क्वचितच रुग्णास लागतात असे औषध रुग्णास बाहेरुन उपलब्ध करुन घेण्याचा सल्ला देण्यात येतो. सदर औषध पुरवठ्याकरीता वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये रु. ८.०० कोटींची आर्थिक तरतुद केली आहे. उपरोक्त रुग्णालयातील खाटा पुर्ण भरल्यावर अतिरिक्त खाटा उपलब्ध करुन रुग्णांचे उपचाराचे प्रयत्न रुग्णालयामार्फत करण्यात येतात. तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी रुग्णांशी संवादासाठी विशेष कार्यशाळाचे आयोजन करण्यात येते. तसेच रुग्णालयात स्वतंत्र वैद्यकिय समाजसेवक कक्ष कार्यरत आहे.

तथापि, ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयासाठी दिनांक ११.०४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये ५८३ पदे मंजूर केली आहेत. सदर पदभरतीसाठी महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरू करणार असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामधील कारभाराच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर रुग्णालयात येणाऱ्या व उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या विचारात घेणे आवश्यक आहे. सदर रुग्णालयाची पुर्ण क्षमता वापरली जाईल तोपर्यंत दररोज रुग्ण दाखल केले जातात व त्यांच्यावर उपचार करण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामार्फत देण्यात येणाऱ्या कार्यक्षम सेवांमुळे सन २०२१ व सन २०२२ या वर्षांकरीता महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यामध्ये ठाणे महानगरपालिकेने ठाणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात महानगरपालिकेमार्फत रुग्णालयाकरीता रु. १२७.८८ कोटीची आर्थिक तरतुद केली आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जनतेला सोयीस्कर वेळेत वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने वंदनीय बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना ही योजना सुरु केली असून सद्यस्थितीत ३८ ठिकाणी सेवा उपलब्ध आहेत. तसेच आपला दवाखाना योजनेमध्ये आजतागायत एकूण ३३०३१६ रुग्णांना आरोग्यसेवा उपलब्ध करुन दिली आहे. या व्यतिरिक्त ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात

पृष्ठ ५५८-१३८

३० नागरी आरोग्य केंद्रे, ६ प्रसुतीगृहे व लोकमान्य टिळक रुग्णालय, ५ डायलेसीस केंद्रे कार्यरत आहेत. तसेच नजीकच्या काळात कौसा येथे १०० खाटांचे नविन रुग्णालय सुरु होणार आहे.

राजीव गांधी वैद्कीय महाविद्यालयात अद्यावत संशोधन प्रयोगशाळा कार्यरत असून दरवर्षी सुमारे २० राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय दर्जाचे शोध निबंध प्रकाशित केले जातात. उपरोक्त महाविद्यालयाच्या भविष्यातील गरजांचा विचार करता माजीवाडा येथील सुमारे १ लक्ष चौ.फुट जागा उपलब्ध करुन दिली आहे. सदर महाविद्यालयातील उच्चस्तराच्या वैद्यकीय तज्ञांच्या उपलब्धतेमुळे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील रुग्णांना चांगल्या प्रकारच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

****

पुन ५५७-२.

लक्षवेधी सूचना ७५.

## सन २०२२ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. महेश लांडगे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची लोकसंख्या साधारणपणे २८ लाखांच्या वर असणे, औद्योगिक आणि आयटी हब असलेल्या या शहरात देशाच्या विविध भागातील सर्व जातीधर्मांचे नागरिक राहत असणे, शहरातील गृहनिर्माण सोसायटीची संख्या सुमारे २५ हजारांच्या आसपास असल्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा बांधकाम परवाना विभागाकडून नवीन प्रकल्प पूर्णत्वास आल्यानंतर बांधकाम व्यावसायिकांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना प्रकल्पातील सोयी-सुविधांचा आढावा न घेता अवैधरित्या बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, बांधकाम व्यावसायिकांकडून रहिवासी सोसायट्यांना प्रकल्प हस्तांतरित करताना महानगरपालिकेकडून प्रकल्पाचा आराखडा देण्याच्या बाबतीत नियम बनविण्याची आवश्यकता तसेच, शहरातील गृहनिर्माण सोसायटीतील रहिवाशांना बांधकाम व्यावसायिकाकडून पार्किंग व्यवस्था, मैला शुद्धीकरण प्लँन्ट, घनकचरा व्यवस्थापन, सीसी टीव्ही इ. मुलभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, याकरिता राज्य शासनाकडून गृहनिर्माण संस्थांमधील नागरिकांना दिलासा देण्याच्यादृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

*****

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गृह निर्माण सोसायटी/प्रकल्पांस एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुदीनुसार भोगवटा पत्रक देताना विकासकांनी सादर केलेल्या नकाशानुसार तसेच इमारत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सर्व संबंधित विभागाकडुन ना-हरकत दाखले सादर केल्यानंतर (उदा. उद्यान, पाणीपुरवठा, जलनिःसारण व नियमानुसार आवश्यक असल्यास अग्निशामक, उद्वाहन तसेच आवश्यकतेनुसार पर्यावरण दाखला, Consent To Establish, Consent To Operate इ. तसेच नियमानुसार रेनवॉटर हार्वेस्टिंग, सोलर सिस्टीम, OWC इ.) सोयीसुविधा मंजुरीनुसार असल्याबाबत खातरजमा केली जाते व त्यानंतर भोगवटा पत्रक देण्यात येते. विकासकास भोगवटा दाखला दिल्यानंतर इमारतीचे हस्तांतरण सोसायटीस करण्याबाबत एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये तरतुद नाही.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणा-या (१०० किलो पेक्षा जास्त) गृहनिर्माण संस्थांनी निर्माण होणा-या ओल्या कच-यावर गृहनिर्माण संस्थेच्या आवारातच प्रक्रिया (composting) करणे आवश्यक आहे. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० मधील तरतूदी नुसार ४००० चौ.मी पेक्षा जास्त बांधकाम क्षेत्रासाठी OWC बंधनकारक असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे. तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० मधील तरतूदीनुसार १०० सदनिकांकरिता Recycling Plant बाबत तरतूद आहे. तसेच पर्यावरण विभागाकडील सन २००६ च्या अधिसूचनेनुसार २०००० चौ.मी. (FSI + NON FSI) मैलाशुध्दीकरण केंद्र (STP) पुरविणे बाबत तरतुद असून त्याप्रमाणे पुर्तता केल्याची खात्री करुन विकासकास भोगवटा पत्रक देण्याची कार्यवाही करण्यात येते.

बांधकाम परवानगी देताना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार पार्किंग व्यवस्था ठेवण्यात येते. तथापि नियमावलीनुसार अनुज्ञेय असलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त वाहनांची संख्या झाल्यामुळे पार्किंगची व्यवस्था अपूरी पडते. त्यामुळे नियमामध्ये नसलेल्या तरतूदी उपलब्ध करणे महानगरपालिकेस बंधनकारक करणे शक्य होत नाही. तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत तरतुद नाही.

*****

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे ~~दुसरे~~ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. नाना पटोले मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"सुरजागड (जिल्हा गडचिरोली) येथे लोह प्रकल्पामधून गौण खनिज उत्खनन करताना शासनाच्या मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन होत असणे, संबधित अधिकाऱ्यासोबत संगनमत करून गौण खनिजांचे स्वामीत्व धन बुडवून मोठया प्रमाणात नियमबाह्य उत्खनन सुरू असणे, गौण खनिजाची वाहतूक करताना वाहनाच्या मंजूर भार क्षमतेपेक्षा जास्त भाराची वाहतूक होत असणे, तसेच वाहतुक करताना जे रस्ते प्रमाणित करण्यात आले आहेत त्या रस्त्या व्यतिरिक्त इतर जवळच्या रस्त्यावरून वाहतुक होत असणे, क्षमतेपेक्षा जास्त भार वाहून नेणाऱ्या वाहनामुळे येथील रस्त्यांची चाळण झाली असणे, तसेच येथे अपघातही होत असणे, येथील वैध/अवैध अवजड वाहतुकीमुळे येथील लोकांचे, वन्यजीवांचे आरोग्य व शांतता धोक्यात येणे तसेच पर्यावरणाचीही प्रचंड प्रमाणात हानी होणे, यासंदर्भात ग्रामस्थांनी शासनाकडे तक्रार केलेली असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

---

## मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

सुरजागड, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथे लोह या मुख्य खनिजासाठी एकूण ३४८.०९ हे.आर. क्षेत्रावर खाण मंजूर करण्यात आलेली आहे. सदर खाणीमधून शासनाच्या संपूर्ण परवान्या घेऊन व प्रदुषणविषयक सर्व नियम पाळून लोह या प्रमुख खनिजाचे उत्खनन व वाहतूक करण्यात येते. तथापि, सुरजागड प्रकल्पातून गौण खनिजाचे उत्पादन होत नाही. त्यामुळे शासनाच्या कोणत्याही मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघनाबाबत प्रश्नच उद्भवत नाही.

परंतु, जवळच्या परिसरातून रस्ते बनविण्याकरिता गौण खनिजाची वाहतुक होत असून, गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीसंदर्भात वेळोवेळी नियंत्रण ठेवण्यासाठी महसूल विभागाच्या पथकाकडून सन एप्रिल, २०२२ ते जुलै, २०२२ या दरम्यान गौण खनिजाची अवैध वाहतूक आढळून आलेल्या वाहनाकडून रु. ३६,६०,६११/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. व गौण खनिजाच्या नियमाचे उल्लंघन होत असल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.

तसेच, उपप्रादेशिक परिवहन विभागामार्फत सन एप्रिल, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीत दोषी आढळून आलेल्या एकूण ७१ वाहनापैकी ५३ वाहने जप्त करण्यात येवून तडजोडी अंती तडजोड शुल्क रुपये ३५,७३,०००/- ऐवढे वसूल करण्यात आले आहे.

सुरजागड लोह खदानीमधुन लोह खनिजाची वाहतूक ही राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३C आष्टी-आलापल्ली वरुन होत आहे. सदर आष्टी-आलापल्ली हा रस्ता पूर्वी राज्य महामार्ग होता व ५ सप्टेंबर २०१४ रोजी या मार्गाची दर्जोन्नती होऊन त्याचे राष्ट्रीय महामार्गामध्ये रुपांतर करण्यात आले. सद्यास्थितीत या रस्त्यावरील खड्डयांचे दुरुस्तीकरणाचे काम सुरु असुन या रस्त्याचे मजबुतीकरण व उन्नती करणाचे काम वार्षीक नियोजन २०२२-२३ अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले आहे. तसेच या कामाचे अंदाज पत्रक मंजूरीकरीता भारतीय राजमार्ग मंत्रालयास सादर करण्यात आलेले आहे. सदर अंदाज पत्रकास मंजूरी मिळताच कामास सुरवात करण्यात येणार आहे. असे असले तरीही सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने कंपनीतर्फे मौजा हेडरी ते एटापल्ली राज्यमार्ग वाढविलेला आहे. आणखी एटापल्ली ते आलापल्ली पर्यंत अशी एकूण ४४ कि.मी. लांबीचा समावेश करुन राष्ट्रीय महामार्गाच्या मानंकानुसार रस्त्याचे मजबूतीकरण करण्यात आलेले आहे. याशिवाय रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्षारोपण करणे व रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्याकरीता कंपनीकडून वाहतूक कर्मचारी तैनात करण्यात आलेले आहे.

सदर खाण प्रकल्पामध्ये ध्वनी प्रदुषण नियंत्रित करण्याकरिता खनिज उत्खनन व हलविणारी यंत्रे/मशिन यासाठी योग्य Encapsulation प्रणाली प्रदान केली आहे. ध्वनी निरीक्षण देखील वेळोवेळी केल्या जात असून, खाण क्षेत्रात सुध्दा ध्वनी प्रदुषण नियंत्रित करणारी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदर खाण प्रकल्पामध्ये पर्यावरणीय प्रदुषण रोखण्याकरिता व वातावरणातील धुळीचे कण रोखण्याकरिता Ambient Air quality monitoring machine स्थापित करण्यात आलेली असून, वायु गुणवत्ता निरीक्षणाकरिता प्रदर्शन बोर्ड लावण्यात आलेले आहेत. या खानिज प्रकल्प परिसरातुन बाहेर पडताना खनिज वाहून नेणारे ट्रक पुर्णपणे ताडपत्रिने झाकुन असल्याची खात्री केली जाते. सदर प्रकल्पाने धुळ प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी खनिज वाहतुकीच्या रस्त्यावर टँकरच्या सहायाने पाणी शिंपडण्यात येते.

****

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना**

**श्री.मंगेश कुडाळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग आणि इतर जातीचा दाखला काढताना सन १९५० आणि सन १९६७ पूर्वीचा दाखला मागितला जाणे, परंतू कित्येक लोकांना तो मिळतच नसणे, त्यामुळे त्यांचे नुकसान होत असणे, सन १९५० आणि १९६७ चा दाखल शोधताना खूप अडचणींचा सामना करावा लागणे, त्याच प्रमाणे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला जाणे व परीक्षेला बसू दिले जात नसणे, तसेच शासकीय आणि निमशासकीय कर्मचारी याना जातीच्या दाखल्याचा पुरावा न मिळाल्यास कर्मचाऱ्यांना नियुक्ती व पदोन्नतीसाठी वंचित रहावे लागणे, तसेच एखाद्या विद्यार्थ्याला किंवा शासकीय कर्मचाऱ्याला दाखला जिल्हयांच्या ठिकाणी काढायचा झाल्यास तो त्यावेळी उपलब्ध झाला नाही तर ते प्रकरण दाखल करुन घेतले जात नसणे त्यामुळे वेळ, मेहनत आणि आर्थिक नुकसान होत असणे, शासनाने जे मूळचे महाराष्ट्रातील रहिवाशी आहेत त्यांच्यासाठी काही शिथिलता आणण्यासाठी करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ हे दि.१ सप्टेंबर, २०१२ रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दि.६.२.२०१० च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जातीसाठी दि.१०.८.१९५०, विमुक्त जाती तसेच भटक्या जमातीसाठी दि.२१.११.१९६१, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यक्तींसाठी दि.१३.१०.१९६७ अशी मानीव दिनांकाची म्हणजे राज्यातील कायमस्वरुपी अधिवासाची अट विहित करण्यात आली आहे. त्यानुसार जात पडताळणी नियम - २०१२ नियम २ (ड) मध्ये सदर अटीचा समावेश करण्यात आला आहे. सदर नियमानुसार आवश्यक ते जातीचे पुरावे सादर केल्यास संबंधित अर्जदारास त्या-त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येते. जात प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे सादर केल्यास त्यांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

३. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ व त्याअंतर्गत नियम, २०१२ नुसार अनुसूचित जाती करीता मानीव दिनांक महामहिम राष्ट्रपती यांचे संविधान (अनुसूचित जाती) आदेश १९५०, दि.१०.०८.१९५० आदेशाचा दिनांक निश्चित करण्यात आलेला आहे. भारतीय संविधान अनुच्छेद ३४१

मधील तरतुदीनुसार अनुसूचित जातीच्या यादीमध्ये नवीन जातीचा समावेश करण्याचा किंवा त्याअनुषंगाने मानीव दिनाकांत बदल करण्याचा अधिकार फक्त संसदेला आहे.

४. अनुसूचित जातीसाठी दि.१०.८.१९५०, विमुक्त जाती तसेच भटक्या जमातीसाठी दि.२१.११.१९६१, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील व्यक्तींसाठी दि.१३.१०.१९६७ असा मानीव दिनांक वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट जर बदलण्यात आली तर मानीव दिनांकानंतर महाराष्ट्र राज्यात इतर राज्यातून लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले असल्याने, असे स्थलांतरित व्यक्ती राज्यातील मूळ रहिवासी असलेल्या मागासवर्गीयांचे लाभ घेण्याची शक्यता आहे, त्यामुळे राज्यातील मूळ मागासवर्गीय व्यक्ती लाभांपासून वंचित राहतील.

५. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र.६०६०/२००८ कु.श्वेता शांतालाल लाल विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या न्यायालयीन प्रकरणात दि.१०.३.१९५० रोजी महाराष्ट्र राज्यात मूळ निवासी नसलेली अनुसूचित जातीच्या व्यक्तीस अनुसूचित जातीकरिता राखीव असलेल्या सवलतींचा लाभ घेता येणार नाही, त्या व्यक्तीस त्याच्या मूळ राज्यात अशा सवलतींचा लाभ मिळेल असा महत्वपूर्ण निकाल दिला आहे. त्यानुसार दि.१.०९.२०१२ च्या अधिसूचनेतील नियम ६(ग) नुसार जाती प्रमाणपत्र धारक शिक्षण, रोजगार इ. प्रयोजनांसाठी त्याच्या मूळ राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झाला असेल तो, त्यांच्या मूळ राज्याच्या अनुसूचित जातीचा/ बौध्द धर्मांतरित अनुसूचित जातीचा/ विमुक्त जातीचा/ भटक्या जमातीचा/ इतर मागासवर्गाचा किंवा यथास्थिती विशेष मागास प्रवर्गाचा असल्याचे मानण्यात येईल आणि त्याबाबत त्याच्या, मूळ राज्यातून व केंद्र सरकारकडून लाभ मिळण्यास हक्कदार असेल. मात्र, महाराष्ट्र राज्याकडून त्याला कोणतेही लाभ मिळणार नाहीत, अशी तरतूद आहे.

६. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्या अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेले महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम-२०१२ मधील मानीव दिनांकाबाबतच्या तरतूदीमध्ये शिथिलता केल्यास इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत व्यक्ती सदर अधिनियमाचा गैरफायदा घेऊन राज्यातील मूळ रहिवासी असलेल्या मागासवर्गीयांचे लाभ घेण्याची शक्यता आहे. सदर वस्तुस्थिती व मा.सर्वोच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयांचा विचार करता मानीव दिनांकाची अट शिथिल करणे योग्य होणार नाही.

***********

लक्षवेधी सूचना क्रमांक.१४३

<u>महाराष्ट्र विधानसभा</u>

<u>सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन</u>

<u>उच्च व तंत्र शिक्षण विभाग</u>

**श्री.सुनिल प्रभू वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४३ खालीलप्रमाणे आहे.**

**"ठाणे स्थानकापासून साडेसात कि.मी. दूर असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या ठाण्यातील उपकेंद्राचे विकास काम अद्याप पूर्ण होऊ न शकल्याने येथील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असलयाचे दि.१४.०७.२०२२ रोजी निदर्शनास येणे, ठाणे महापालिकेने नाममात्र दरात बाळकूम परिसरात सुमारे २७ हजार चौ.मी. जागा मुंबई विद्यापीठाच्या विद्यापीठ उपकेंद्र सुरु करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणे, त्यानंतर २०१४ मध्ये उपकेंद्र सुरु करण्यात आल्यानंतर अद्यापही येथील विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन न दिल्यामुळे विद्यार्थ्यांची पायाभूत सुविधा अभावी प्रचंड गैरसोय होत असणे. त्याच बरोबर ठाणे स्टेशन पासून उपकेंद्राकडे जाण्यासाठी कोणतीही बससेवा व दिशा फलक उपलब्ध नसणे, सदर विद्यापीठ उपकेंद्रास संरक्षक भिंत, उद्यान व इतर अनेक आवश्यक सुविधा उपलब्ध नसणे, याबाबतची विकासकामे करण्यासाठी ठाणे महापालिकेने राज्यशासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेला ४ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी विद्यापीठ उपकेंद्राचा लाभ घेणारे विद्यार्थी यांचेमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."**

मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन

सन १८५७ मध्ये स्थापन झालेल्या मुंबई विद्यापीठाचे भौगोलिक क्षेत्र मुंबई, ठाणे, रायगड, सिंधुदूर्ग व नव्याने स्थापन झालेल्या पालघर परिसरात पसरलेले आहेत. मुंबई विद्यापीठअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयाची व विद्यार्थ्यांची संख्या पाहता मुंबई विद्यापीठाचे बाळकुम, ठाणे येथे उपकेंद्र स्थापन करण्यात आले आहे. या ठिकाणी तळमजला अधिक दोन मजल्याची इमारत बांधण्यात आली असून, या इमारतीत बी.बी.ए.- एल.एल.बी. (ऑनर्स), बी.एम.एस.- एम.बी.ए. हे पाच वर्षी अभ्यासक्रम सुरु आहेत. तसेच मुंबई विद्यापीठाचे दुरस्थ व मुक्त शिक्षण (IDOL) यांचे कार्यालय कार्यान्वित आहे. सदरहू उपकेंद्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने कुलसचिव व अधिसभा सदस्य, मुंबई विद्यापीठ तसेच ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यात बैठक होऊन वास्तुविशारदमार्फत उपकेंद्राचा मास्टर प्लॅन तयार करण्यात आला आहे. त्याप्रमाणे ठाणे महानगरपालिकेमार्फत करावयाच्या कामांसाठीचा निधीचा प्रस्ताव महानगरपालिकेने नगरविकास विभागास सादर केला आहे. सदर प्रस्ताव नगर विकास विभागाच्या विचाराधीन आहे. तसेच वास्तुविशारदाने तयार केलेल्या विकास आराखड्याप्रमाणे मुलांसाठी व मुलींसाठी वस्तिगृह तसेच उपकेंद्राचा विद्याविषयक, प्रशासकीय संशोधन, विस्तार कार्य सुरक्षित पध्दतीने होण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारा स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही विद्यापीठामार्फत सुरु आहे. ठाणे उपकेंद्रात विद्यार्थी व इतर घटकांना येण्या-जाण्यासाठी सुलभता यावी. यासाठी बस व्यवस्था व जागोजागी दिशादर्शक फलक लावण्यासाठी संबंधित कार्यालयाशी विद्यापीठामार्फत पाठपुरावा सुरु आहे.

******

रोटा/एच ५८३ [७००-१०-२०२२]

G:\Lalit Moule\Desktop\LAQ ... CR-103-2022 Lakshvedhi Suchna 143 Mumbai Uni. Mumbai Sunil Prabhu.docx

लक्षवेधी सूचना क्र.२५७

श्री. दौलत दरोडा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.

"राज्यातील गोरगरीब आदिवासी बांधवांना सालाबादप्रमाणे मोफत खावटी वाटप आदिवासी विभागामार्फत करण्यात आली असल्याने यावर्षी अतिवृष्टीमुळे आदिवासी बांधवांच्या धानाची मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे, त्यामुळे आदिवासी समाज चिंतेत असून यावर्षीसुध्दा मोफत खावटी वाटप मंजूर करण्याकरिता शासनाकडे केलेली मागणी, तसेच मागील वर्षापासून महाराष्ट्रातील भातशेती शेतक-यांची बोनस योजना शासनाने बंद केली असून शेतक-यांनी भातशेती न करण्याचा निर्णय घेतल्याने शेत जमिन पडीक राहणे, शहापूर विधानसभा मतदार संघ हा आदिवासी बहुल असल्याने तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.५.८.२०२२ रोजीच्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे आदिवासी बांधवांना मोफत खावटी वाटप व भातशेती शेतक-यांना बोनस मंजूर करण्याबाबत विनंती करण्यात येणे, परंतु अद्यापही या संदर्भात शासनाने कोणताच निर्णय न घेतल्याने आदिवासीमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका..."

---

मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

आदिवासी भागात सावकार व व्यापा-यांकडून होणारी आदिवासी लोकांची पिळवणूक थांबविण्यासाठी शासनाने महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम, १९७६ अन्वये आदिवासी भागात सावकारी करण्यास बंदी घातली आहे. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अल्पभुधारक व शेतमजुर यांना माहे जून ते सप्टेंबर मध्ये ऐन पावसाळयात ज्यावेळी रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे आदिवासी लोकांची (अल्प भुधारक, भूमीहीन व शेतमजुर) आर्थिक अडचण तसेच उपासमार होऊ नये यासाठी सन १९७८ पासुन खावटी कर्ज योजना सुरु करण्यात आली होती. शासनाने खावटी कर्ज योजना लागु करुन योजना राबविण्यासाठी आदिवासी विकास महामंडळास फिरता निधी उपलब्ध करुन दिला होता. सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत खावटी कर्ज वाटप करण्यात आले असुन सन २०१४-१५ पासुन खावटी कर्ज वाटप करण्यात आले नाही.

दिनांक २२ मार्च, २०२० पासून कोराना महामारीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपुर्ण देशामध्ये लॉकडाऊन लागू करण्यात आलेला होता. लॉकडाऊनमुळे कामे बंद असल्यामुळे अनुसूचित जमातीच्या कुटुंबियांसमोर बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झालेला होता. रेल्वे, सार्वजनिक बस वाहतुक व खाजगी वाहतूक बंद असल्याने अनुसूचित जमातीच्या कुटुंबास अन्नधान्याची उपलब्धता व त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला होता. दळणवळणाच्या साधनाची मर्यादा व कमी रोजगाराची उपलब्धता या गोष्टीचा विचार करता त्या आपातकालीन परिस्थितीमध्ये अनुसूचित जमातीच्या कुटुंबियाना न्याय देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने त्वरीत पावले उचलून

अनुसूचित जमातीच्या कुटूंबियांना मदत करावी व त्यासाठी सन २०१३-१४ पासनू बंद असलेली खावटी योजना पुनर्जिवित करण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधींनी महामंडळ व शासनास केलेली होती.

त्याअनुषंगाने कोरोना विषाणूच्या (Covid - १९ ) प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर अनुसूचित कुटुंबियांना सहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजना १ वर्षासाठी (सन २०२० - २१) राबविण्यात आली होती. खावटी अनुदान योजनेतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबियाना रु.४,०००/- (रुपये चार हजार फक्त) प्रति कुटुंब अनुदान ज्यामध्ये रु.२,०००/- किमतीचे वस्तु स्वरुपात वाटप व रु.२,०००/- इतकी रक्कम त्यांच्या बँक/डाक खात्यात वितरीत करण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या दिनांक १२ जून, २०१४ च्या पत्रान्वये राज्य शासनाने किमान आधारभूत किंमतीपेक्षा अधिकची रक्कम (बोनस) देण्याचा निर्णय घेतल्यास, त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी राज्यशासनाची राहील व त्याकरिता केंद्र शासनाकडून कोणतीही आर्थिक भरपाई मिळणार नाही असे स्पष्टपणे कळविले आहे.पणन हंगाम २०२१-२२ मध्ये केंद्र शासनाने धानासाठी निश्चित केलेल्या रु.१९४०/- प्रती क्विंटल इतक्या हमीभावाने शेतक-यांकडून धान खरेदी करण्यात येऊन शेतकऱ्यांना देय असलेले चुकारे अदा करण्यात आले आहेत.पणन हंगाम २०२१-२२ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर राशी (बोनस) देण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींकडून शासनास मागणी प्राप्त आहेत. त्यानुषंगाने कार्यवाही प्रस्तावित आहे.

शहापूर विधानसभा मतदार संघातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.५.८.२०२२ रोजीच्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे आदिवासी बांधवांना मोफत खावटी वाटप करण्याबाबत विनंती केली आहे. तथापी, कोरोना विषाणूच्या (Covid - १९ ) प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर खावटी अनुदान योजना १ वर्षासाठीच (सन २०२० - २१) राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, चालू वित्तीय वर्षामध्ये (सन २०२२ - २३ ) खावटी अनुदान योजना राबविण्याचे प्रस्तावित नाही.

******************************

लक्षवेधी सूचना क्र.३३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. राजेश एकडे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये पुढीलप्रमाणे लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे-

"केंद्र शासनाच्या अनुसूचित जमातीच्या २०११ च्या जनगणनेनुसार वऱ्हाड प्रांतातील, अमरावती महसूल विभागातील सातपुडा डोंगररांगामधील महादेव डोंगर पायथ्याशी असलेल्या, पूर्णा खोऱ्यातील पायन घाटातील, महादेव कोळी जमातीच्या लोकसंख्या असलेल्या गावांचा अनुसूचित जमाती क्षेत्रात समावेश असणे, निवडणूक आयोगाच्या नियमानुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये सदर गावांना अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाचे आरक्षण देण्यात येऊन निवडून आलेले सदस्यांनी पदाचा उपभोग घेणे, तसेच सदर महादेव कोळी जमात असलेल्या अनुसूचित जमाती (ST) क्षेत्रातील गावांमध्ये राज्य शासनाच्या अनुसूचित जमातीच्या करीता कल्याणकारी व विकासात्मक योजनांच्या आराखडयामध्ये जसे आदिवासी विभागाच्या शबरी घरकुल योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती योजना इत्यादी योजनांचा समावेश असणे, भारतीय राजपत्र अनुसूचित जाती व जमातींच्या सुधारीत आदेशामध्ये १९७६ अनुसार महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये २९ क्रमांकावर कोळी महादेव जमातीचा समावेश असणे, महाराष्ट्र राज्यात कोळी महादेव अनुसूचित जमात महामहीम राष्ट्रपती यांचे अध्यादेश १९५० पूर्वीपासून असणे, आदिवासी मसूदा वार्षिक उप-योजना १९९४-९५ नुसार आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य नुसार अकोला, बुलढाणा, अमरावती जिल्हयामध्ये कोळी महादेव प्रमुख आदिवासी जमात असून २०११ च्या जनगणनेनुसार अकोला, बुलढाणा, अमरावती जिल्हयातील एकूण कोळी महादेव आदिवासी जमातीची लोकसंख्या ५६,११९ असणे, तरीही कोळी महादेव जमातीचे प्रमाणपत्र मागणी केली असताना उपविभागीय अधिकारी यांचेकडून १९५० पूर्वीचे लेखी स्वरुपाचे पुराव्याची मागणी करणे, त्यामुळे महादेव कोळी जमातीच्या लोकांना अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रमाणपत्र मिळण्यास बाधा निर्माण होणे, त्यामुळे सदर कोळी महादेव जमातीचे लोकांना उच्च शिक्षण, नोकरीतील आरक्षण इत्यादी पासून वंचित ठेवल्या जाणे, त्यामुळे कोळी महादेव जमातीतील लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होऊन शासनाप्रति रोष व्यक्त होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया"

---

मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ नुसार मा. राष्ट्रपती महोदयांनी अनुसूचित जमातीची प्रथम यादी दिनांक ६ सप्टेंबर, १९५० रोजी प्रसिध्द केलेली आहे. सदर यादीमध्ये केंद्र शासनामार्फत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेली आहे. "अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) कायदा, १९७६ नुसार महाराष्ट्र राज्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीत अ.क्र. २९ वर कोळी महादेव, डोंगर कोळी अशी नोंद आहे.

कु. माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे या विशेष अनुज्ञा याचिकेमध्ये निर्णय देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या सुचना विचारात घेवून महाराष्ट्र शासनाने, "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३)," दि. १८.१०.२००१ पासून लागू केलेला असून त्याअंतर्गत "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३," तयार केलेले आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाने कु. माधुरी पाटील प्रकरणी दिलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच उक्त नमूद अधिनियम, २००० व नियम ,२००३ नुसार अनुसूचित जमातीचे दाखले देण्याचे व त्याच्या पडताळणीचे काम चालते. अनुसूचित जमातीची प्रथम यादी ०६ सप्टेंबर, १९५० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने १९५० पूर्वीच्या पुराव्यांना अनन्यसाधारण महत्व आहे.

"महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ मधील नियम ३(३) मध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर करावयाची यादी देण्यात आलेली आहे. यामध्ये १९५० पूर्वीच्या पुराव्याचा उल्लेख आहे. तथापी नियम २००३ मधील नियम ३ (४) नुसार अर्जदार कोणताही एक किंवा अनेक दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल तर अशा प्रकरणी अर्जदार त्याबाबतची कारणे आपल्या शपथपत्रात नमूद करील आणि सक्षम प्राधिकाऱ्यास त्यावर विचार करता येईल व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, गुणवगुणावरुन दाव्याचा निर्णय देईल अशी तरतूद आहे. तसेच अधिनियम २००० च्या कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदारावर आहे. महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीतील नमूद अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करणाऱ्या प्रत्येक अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस जमातीचे प्रमाणपत्र प्राप्त होते. विशिष्ट क्षेत्रातील अनुसूचित जमातीसाठी वेगळे नियम अस्तित्वात नाहीत.

******

महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. दौलत दरोडा, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"आज संपूर्ण देशात स्वातंत्र्यदिनाचा अमृत महोत्सव साजरा करत असतांना शहापूरातील (जि. ठाणे) १२ आदिवासी गावपाड्यांमध्ये रस्तेच नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, गावपाड्यावर जाण्यासाठी साधे रस्तेही नसल्याने ग्रामस्थांना मुख्य बाजारपेठ गाठण्यासाठी रोज सात ते आठ कि.मी. ची पायपीट करावी लागणे, शालेय विद्यार्थी, आबालवृध्द तसेच गरोदर महिला व रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, पावसाळ्यात येथील रस्त्यावर चिखल व पाणी जमा झाल्याने मोठमोठे नाले तयार होऊन पाणी वाहणे, यामुळे तेथील आदिवासींना नेहमीच अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, या संदर्भात प्रशासनाकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने त्यांच्यात निर्माण होत असलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही ,याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

<u>मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन</u>

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील १२ आदिवासी पाड्यांपैकी अस्नोली-तईचीवाडी, टेंभा-आंबिवली या वाड्यांना दळणवळणासाठी रस्ता आहे. अघई-ठाकूरपाडा या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे. तसेच, अजनूप-दापूर माळ हा रस्ता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहापूर यांच्याकडून प्रस्तावित आहे.

तसेच, बोरशेती-लोभीपाडा, साकडबाब-तळ्याची वाडी, टेंबा-आंबिवली, अघई-ठाकुरपाडा, शिरगांव-असोई-तईची वाडी, उंभ्रई-कातकरी वस्ती या गावपाड्यामध्ये ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनांतर्गत रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरण/ डांबरीकरण करण्यात आले आहे.

वेहेलोंडे-सापटेपाडा या रस्त्याचा काही भाग वगळता उर्वरीत भागावर डांबरीकरण करण्यात आले आहे. सदरच्या रस्त्याचा काही भाग व अघनवाडी ते वरसवाडी आणि शिरोळ-सावरकूट पाडा जोडरस्ता या रस्त्यांवरील काही भाग वन विभागाच्या हद्दीतील व खाजगी मालकीचा आहे. वन विभागाकडून परवानगी व खाजगी मालकाकडून भुसंपादनाची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर सदर रस्ते महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्याचे पंचायत समिती,

शहापूर यांच्याकडून नियोजित आहे. तसेच, कोळंभे-बोरशेती खु. गावापर्यत जोडरस्ता असून देवीचापाड्याकडे जाणारी पाऊलवाट खाजगी मालकीची असल्याने सदर जागा रस्त्यासाठी संपादित करण्याचे ग्रामपंचायत मार्फत प्रस्तावित आहे.

कोठारे-वेटापाडा हा अवर्गीकृत संपूर्ण रस्ता वन विभागाच्या व खाजगी मालकीच्या हद्दीतून जातो. वेटा या ठिकाणी मुंबरी धरणामुळे बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या रस्त्यास सद्यस्थितीत जो पर्यायी रस्ता प्रस्तावित आहे, तो मुरबीचापाडा ते वेटापाडा मार्गे कोठारे या गावाला जातो. सदर रस्त्याचे काम जलसंपदा विभागामार्फत प्रस्तावित आहे.

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये राज्यस्तर लेखाशिर्ष ५०५४ ५११७ अंतर्गत शहापूर तालुक्यातील रु. ३४.७५ कोटी इतक्या रकमेच्या ६७ रस्ते व पुलांच्या बांधकामांना, तर राज्यस्तर लेखाशिर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत रु. ९.४० कोटी इतक्या रकमेच्या ९१ रस्ते व पुल सुधारणांच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

*******